
08 SEP 2026

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



# शिवाजी विद्यापीठात रानपुष्पांचा दरवळ

कोल्हापूर : श्रावणातल्या ऊन-पावसाचा खेळ सुरू झाला की त्याबरोबर रानपुष्प बहराला सुरुवात होते. सातारा जिल्ह्यातील कास पठार हे खास त्याच्या अशा पुष्पवैभवासाठी ओळखले जाते. शिवाजी विद्यापीठाच्या परिसरात याच वेळेला विविध रानफुलांच्या बहराला सुरुवात होते. यंदाही अशी अनेक रानफुले विद्यापीठाच्या परिसरात बहरली आहेत. त्यातीलच काही फुलांचे हे देखणे, चित्ताकर्षक दर्शन. (छाया : डॉ. आलोक जत्राटकर)

0 8 SEP 2026

सकाळ

जनसपर्क कक्ष
...वाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'बॅकलॉग'च्या विद्यार्थ्यांना विशेष संधी

## विद्यापीठाचा सकारात्मक निर्णय; परीक्षेसाठी वर्षाची मुदतवाढ

■ संतोष मिठारी : सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. ७ : पदवी अभ्यासक्रमाचा निर्धारित कमाल कालावधी पूर्ण झाल्यानंतर अधिकाधिक तीन विषय राहिलेल्या विद्यार्थ्यांना वर्षाची विशेष मुदतवाढ देऊन परीक्षा देण्याची संधी मिळणार आहे. याबाबतचा सकारात्मक निर्णय आज शिवाजी विद्यापीठाच्या विद्या परिषदेने घेतला.**

सीबीसीएस, एनईपीच्या संक्रमण काळात अभ्यासक्रम आणि परीक्षा पद्धतीत अनेक बदल झाले. या काळात एटीकेटी अथवा बॅकलॉग असलेल्या विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या नियमानुसार पुढील वर्गात प्रवेश देण्यात आला; पण, आता निर्धारित कमाल कालावधी पूर्ण झाले नसल्याने केवळ एक-दोन विषयांचा बॅकलॉग असलेल्या विद्यार्थ्यांसमोर पदवी पूर्ण करण्याचा प्रश्न निर्माण झाला. अशा बॅकलॉग राहिलेल्या विद्यार्थ्यांचा प्रश्न 'सकाळ'ने पाच सप्टेंबरच्या अंकात 'पाच हजार विद्यार्थ्यांची अडकली 'पदवी'' या वृत्तातून मांडला. त्याची दखल विद्यापीठाने घेतली. अधिसभा सदस्य ॲड. अभिषेक मिठारी यांनी देखील याप्रश्नी कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांना निवेदन दिले. त्यानंतर कुलगुरूंच्या निर्देशानुसार संबंधित विषय बोर्ड ऑफ डीनमार्फत आज विद्या परिषदेच्या बैठकीत ठेवला. त्यात बॅकलॉगच्या विद्यार्थ्यांना परीक्षा देण्याची विशेष संधी देण्याचा निर्णय झाला. दरम्यान, शासनाच्या नव्या निकषानुसार महाविद्यालयांमधील पद भरतीची प्रक्रिया निश्चितीसाठी सहा सदस्यीय समिती गठीत केली.


पाच हजार विद्यार्थ्यांची अडकली 'पदवी'
विषयांचा बॅकलॉग राहिल्याचा फटका; निर्धारित कालावधीही संपला

सकाळ IMPACT

### पाच हजार विद्यार्थ्यांना न्याय

■ बॅकलॉगच्या विद्यार्थ्यांना परीक्षा देण्याची संधी उपलब्ध करून देण्याचा चांगला निर्णय विद्यापीठाने घेतला. या निर्णयामुळे सुमारे पाच हजार विद्यार्थ्यांना न्याय मिळणार आहे. त्याबद्दल सकाळ, कुलगुरू डॉ. कामत आणि विद्या परिषद सदस्यांचे आभार व्यक्त करत असल्याची प्रतिक्रिया ॲड. अभिषेक मिठारी यांनी व्यक्त केली.

एक-दोन विषय राहिल्यामुळे विद्यार्थी पदवीपासून वंचित राहून त्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, याउद्देशाने विद्यार्थी हितास्तव विद्या परिषदेने या विद्यार्थ्यांना परीक्षेची विशेष संधी देण्याबाबतचा निर्णय घेतला आहे. साधारणतः जानेवारीत या विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्याचे नियोजन आहे. याबाबत परीक्षा व मूल्यमापन मंडळाला पुढील कार्यवाहीचे निर्देश दिले आहेत.
**-डॉ. आर. के. कामत, कुलगुरू**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 SEP 2026
सकाळ

# विद्यापीठात मोडी अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र आणि इतिहास अधिविभागातर्फे मोडी लिपी प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. अभ्यासक्रमाचा कालावधी सहा महिने आहे. इच्छुकांना २८ सप्टेंबरपर्यंत प्रवेश घेता येईल. या अभ्यासक्रमासाठी किमान शैक्षणिक पात्रता पदवी आवश्यक आहे. या अभ्यासक्रमाचा संशोधक विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्राच्या समन्वयक डॉ. नीलांबरी जगताप यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 SEP 2026
पुण्यनगरी



# 'सीएके'चे आठ विद्यार्थी गुणवत्ता यादीत : बोराडे

**जयसिंगपूर :** श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसच्या कॉलेज ऑफ आर्किटेक्चरने आपले स्थान निर्माण केले आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या निकालात आठ विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत पहिल्या दहामध्ये येण्याचा मान मिळवला. भविष्यात ही यशाची परंपरा कायम ठेवावी, अशा शब्दांत अध्यक्ष डी. जी. बोराडे यांनी शुभेच्छा दिल्या. या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा शिवाजी पेठेतील संस्थेच्या सभागृहात झाला, त्यावेळी ते बोलत होते. स्वागत प्राचार्य सी. एस. दुदगीकर यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या एप्रिल २०२६ मध्ये झालेल्या अंतिम वर्ष बॅचलर ऑफ आर्किटेक्चर परीक्षेत गुणवत्ता यादीत रिद्धी जाधव (प्रथम), समृद्धी पोवार (द्वितीय), ओंकार जाधव (तृतीय), पृथ्वीराज जाधव (चौथा), उद्धव साळोखे (पाचवा), सिद्धी महाजन (आठवा), अमृता शिंदे (नयवा), आदित्य खाडे (दहावा) यांनी पहिल्या दहामध्ये स्थान मिळवले. इतर विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. चेअरमन डॉ. के. जी. पाटील, व्हाईस चेअरमन डी. जी. किल्लेदार, सर्व संचालक, पदाधिकारी, शिक्षक, कर्मचारी उपस्थित होते. या समारंभानंतर आर्किटेक्ट टी. डी. गाडगीळ यांचे व्याख्यान झाले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 SEP 2026
तरूण भारत

# करिश्मा मणेर–मुल्ला यांना पीएच. डी.

- अत्यंत कष्टातून तसेच प्रतिकूल परिस्थितीतून प्राप्त केली पदवी

**कोल्हापूर :** चंबुखडी परिसरातील करिष्मा नबीलाल मणेर –मुल्ला यांनी शिवाजी विद्यापीठातून भौतिकशास्त्र शाखेतून अवकाश विज्ञान विषयात पीएच. डी. पदवी संपादन केली. याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. त्यांनी 'स्टडी ऑफ आयनोस्फेरिक इक्वेटोरियल प्लाझ्मा बबल युसिंग ऑप्टीकल अँड जीएनएसएस एक्सपेरिमेंट अॅट कोल्हापूर' या विषयांमध्ये विशेष संशोधन केले. करिष्मा मुल्ला यांनी यापूर्वी सेट परीक्षा देखील उत्तीर्ण केली आहे. अत्यंत सामान्य परिस्थितीतून शिक्षण घेऊन डॉक्टरेट पदवी प्राप्त करणाऱ्या करिष्मा मुल्ल या सुरुवातीपासूनच हुशार विद्यार्थिनी आहेत. अत्यंत कष्टातून आणि प्रतिकूल परिस्थितीतून शिक्षण



घेऊन त्यांनी मिळवलेल्या या उत्तुंग यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. पीएचडी पदवी प्राप्त करण्यासाठी त्यांना डॉ. आर. एस. व्हटकर यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. पी. एस. पाटील, डॉ. आर. जी. सोनकवडे, डॉ. के. वाय. राजपूरे, डॉ. घोडपागे, जावेद अहंगार, नागेश कोठावळे, अक्षय माने आणि नबीलाल मणेर, हुसेन मुल्ला यांचे सहकार्य लाभले. करिष्मा यांनी प्राप्त केलेल्या उल्लेखनीय शैक्षणिक यशाबद्दल कुटुंबीय, मित्रपरिवार, सहकारी आणि शुभचिंतकांकडून त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

0 8 SEP 2026

जनसपर्क कक्ष
लोकमत ावाजी विद्यापीठ, कोल्हापूर

NAAC "A++"
Grade with CGPA 3.52

# SHIVAJI UNIVERSITY

## School of Engineering and Technology

**(Department of Technology) Inst. Code : EN6028**

(AICTE Approved and recognized by DTE, Govt. of Maharashtra)

## ◆ A-CAP Admission 2026-27 ◆

### Application are invited for vacant seats after CAP Round for following B. Tech. & M. Tech. Programme

| B. Tech. 1st & Direct 2nd Year Course Name | M. Tech. 1st Yr. Course Name |
|---|---|
| Chemical Engineering | Computer Science and Technology |
| Civil Engineering | Energy Technology |
| Computer Science and Technology | Environmental Science and Technology |
| Electronics & Telecommunication Engg. | Electronics & Telecommunication Engg. |
| Food Technology | Food Technology |
| Mechanical Engineering | |

Scan to Apply

**Interested candidates must apply using QR Code and attend A-CAP on following dates.**

- **B. Tech. 1st Yr. - 10th Sept. 2026**
- **B. Tech. Direct Yr - 11th Sept. 2026**
- **M. Tech. 1st Yr. - 11th Sept. 2026**
- **Last Date to Register for Admission 9th Sept. 2026 at 12.00 noon.**
- **For Details Visit https://apps.unishivaji.ac.in/**

**Office Phone :** 0231260 - 9424, 9413, 9439
**Mobile Contacts :** 9822454255, 9822262946,
9922924871 9975945011, 9422417686, 9975490278.

**Dr. V. N. Shinde**
Registrar
Shivaji University, Kolhapur

Date : 08/09/2026

0 8 SEP 2026

जनसंपर्क कक्ष
सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

NAAC "A++"
Grade with CGPA 3.52

# SHIVAJI UNIVERSITY

## School of Engineering and Technology

**(Department of Technology) Inst. Code: EN6028**

(AICTE Approved and recognized by DTE, Govt. of Maharashtra)

## A-CAP Admission 2026-27

**Application are invited for vacant seats after CAP Round for following B. Tech. & M. Tech. Programme**

| B. Tech. 1st & Direct 2nd Year Course Name | M. Tech. 1st Yr. Course Name |
|---|---|
| Chemical Engineering | Computer Science and Technology |
| Civil Engineering | Energy Technology |
| Computer Science and Technology | Environmental Science and Technology |
| Electronics & Telecommunication Engg. | Electronics & Telecommunication Engg. |
| Food Technology | Food Technology |
| Mechanical Engineering | |

Scan to Apply

Interested candidates must apply using QR Code and attend A-CAP on following dates.

- B. Tech. 1st Yr. – 10th Sept. 2026
- B. Tech. Direct Yr. – 11th Sept. 2026
- M. Tech. 1st Yr. – 11th Sept. 2026
- Last Date to Register for Admission 9th Sept. 2026 at 12.00 noon.
- For Details Visit https://apps.unishivaji.ac.in/

Office Phone: 0231260-9424, 9413, 9439
Mobile Contacts: 9822454255, 9822262946, 9922924871 9975945011, 9422417686, 9975490278.

Dr. V.N.Shinde
Registrar
Shivaji University, Kolhapur

Date: 08/09/2026

जनसंपर्क कक्ष

08 SEP 2026 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापू

# SHIVAJI UNIVERSITY

**School of Engineering and Technology**

**(Department of Technology) Inst. Code: EN6028**

(AICTE Approved and recognized by DTE, Govt. of Maharashtra)

NAAC "A++" Grade with CGPA 3.52

## A-CAP Admission 2026-27

## Application are invited for vacant seats after CAP Round for following B. Tech. & M. Tech. Programme

| B. Tech. 1st & Direct 2nd Year Course Name | M. Tech. 1st Yr. Course Name |
|---|---|
| Chemical Engineering | Computer Science and Technology |
| Civil Engineering | Energy Technology |
| Computer Science and Technology | Environmental Science and Technology |
| Electronics & Telecommunication Engg. | Electronics & Telecommunication Engg. |
| Food Technology | Food Technology |
| Mechanical Engineering | |

Scan to Apply

**Interested candidates must apply using QR Code and attend A-CAP on following dates.**

- **B. Tech. 1st Yr. - 10th Sept. 2026**
- **B. Tech. Direct Yr. -11th Sept. 2026**
- **M. Tech. 1st Yr. -11th Sept. 2026**
- **Last Date to Register for Admission 9th Sept. 2026 at 12.00 noon.**
- **For Details Visit https://apps.unishivaji.ac.in/**

**Office Phone: 0231260-9424, 9413, 9439 Mobile Contacts: 9822454255, 9822262946, 9922924871 9975945011, 9422417686, 9975490278.**

**Dr. V.N.Shinde**
**Registrar**
**Shivaji University, Kolhapur**

**Date: 08/09/2026**

0 8 SEP 2026

जनसंपर्क कक्ष
तरूण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापू

# SHIVAJI UNIVERSITY

## School of Engineering and Technology

**(Department of Technology) Inst. Code: EN6028**

(AICTE Approved and recognized by DTE, Govt. of Maharashtra)

NAAC "A++"
Grade with CGPA 3.52

## A-CAP Admission 2026-27

**Application are invited for vacant seats after CAP Round for following B. Tech. & M. Tech. Programme**

| B. Tech. 1st & Direct 2nd Year Course Name | M. Tech. 1st Yr. Course Name |
|---|---|
| Chemical Engineering | Computer Science and Technology |
| Civil Engineering | Energy Technology |
| Computer Science and Technology | Environmental Science and Technology |
| Electronics & Telecommunication Engg. | Electronics & Telecommunication Engg. |
| Food Technology | Food Technology |
| Mechanical Engineering | |

Scan to Apply

**Interested candidates must apply using QR Code and attend A-CAP on following dates.**

- B. Tech. 1st Yr. – 10th Sept. 2026
- B. Tech. Direct Yr. – 11th Sept. 2026
- M. Tech. 1st Yr. – 11th Sept. 2026
- Last Date to Register for Admission 9th Sept. 2026 at 12.00 noon.
- For Details Visit https://apps.unishivaji.ac.in/

Office Phone: 0231260-9424, 9413, 9439
Mobile Contacts: 9822454255, 9822262946, 9922924871 9975945011, 9422417686, 9975490278.

Date: 08/09/2026

Dr. V.N.Shinde
Registrar
Shivaji University, Kolhapur